# संविधानाची सोईनुसार अंमलबजावणी
## सहकार आयुक्त x साखर आयुक्त

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्वप्रकारच्या सहकारी संस्था नोंदणी झालेल्या आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुत गिरण्या, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या, खरेदी विक्री संघ, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, महिलांच्या सहकारी संस्था, बेरोजगारांच्या सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था इत्यादीं संस्थांचा प्रामुख्याने समावेश होतो.

३१ मार्च २००९ अखेर राज्यात वर उल्लेखल्याप्रमाणे २ लाख ५ हजारांच्यावर सहकारी संस्था सहकारी कायद्यान्वये नोंदणी झालेल्या आहेत. राज्य सरकारने या सहकारी संस्थांना कायद्याच्या चौकटीतून सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी अधिकृत परवाना देवून जन्मास घातलेले आहे. साखर कारखाने व सुत गिरण्या सोडून इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्था कार्यकर्त्यांनी स्वबळावर मोठ्या कष्टाने आपली पत पणाला लावून या सहकारी संस्थांची निर्मिती केलेली आहे. साखर कारखाने व सुत गिरण्या यांची उभारणी मात्र कार्यकर्त्यांच्या मार्फत केवळ १० टक्के रक्कम सभासदांकडून व उर्वरित ९० टक्के रक्कम शासन, बँका व नाबार्ड यांचेमार्फत पैसा उभा करून म्हणजेच **मोठी संकल्पना मांडून शेतकऱ्याना पुढे करून कायदा व सरकारी आदेशांच्या चौकटीचा फायदा घेऊन** राज्यात अत्यंत विदारक चित्र दुर्देवाने उभे राहिले आहे.

राज्याचे सहकार आयुक्त व राज्याचे साखर आयुक्त हे दोघेही I.A.S.अधिकारी असून, साखर धंद्यावर पुर्णपणे नियंत्रण करण्याचे काम शासनाचे प्रतिनिधी म्हणून **साखर आयुक्त** करतात. बाकी इतर सर्व सहकारी संस्थांचे नियंत्रक म्हणून राज्याचे **सहकार आयुक्त** काम करतात. परंतु महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ या कायद्याप्रमाणे साखर कारखान्यासहीत वरील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना या अंतर्गतच काम करण्याची जबाबदारी आहे. आणि कायद्याला बगल देवून किंबहुना आर्थिक पिळवणूक करण्याच्या उद्देशाने ज्या सहकारी संस्थांचे पदाधिकारी / संचालक काम करतात त्या सर्वांसाठी वरीलप्रमाणे सहकारी कायदा सक्षम आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात संविधानाची चेष्टा राज्य सरकारच्या प्रतिनिधीमार्फत दैनंदिनरित्या खुलेआम राजरोसपणे कशी चालू आहे, त्याचे विश्लेषण खालिलप्रमाणेः-

राज्यातील अलिकडचे उदाहरण लक्षात घेतले तर एका माजी खासदारास एका बँकेत १.७५ लाख रूपयांच्या च्या तथाकथित आर्थिक गैरव्यवहारात गुंतल्या प्रकरणी ३ वर्षाची सजा न्यायालयाने सुनावली आहे. ठेवीदारांना ठेवी परत न दिल्याबद्दल कंझ्युमर (ग्राहक) कोर्टाने एका पतसंस्थेच्या संचालकांना तुरूंगवासाची सजा सुनावली आहे. नोकर भरती, विविध प्रकारची खरेदी, सदोष कर्ज वाटप व त्यामुळे झालेली थकबाकी व त्यांचा अंतिम परिणाम म्हणून **ठेवीदारांना ठेवी वेळेत न देणे किंबहुना मुदत संपलेल्या ठेवी परत न देणे त्यामुळे राज्यातील अनेक पतसंस्था व बँका यांच्यामध्ये काम करणारे पदाधिकारी / संचालक / कार्यकारी संचालक यांना राज्याच्या सहकार आयुक्तांनी इंडियन पिनलकोडचा आधार घेवून तुरूंगात पाठविणेचे काम याच**

**सहकार कायद्याचा आधार घेवून** केलेले आहे.

परंतु हाच **कायदा राज्यातील साखर कारखान्यांसाठी मात्र राज्याच्या साखर आयुक्तांनी म्हणजेच शासनाने लागू केला नाही**. हे या ठिकाणी आम्हांस स्पष्ट करावयाचे आहे. राज्यातील एकही साखर कारखाना आपल्या सभासदांना कारखान्याच्या निर्मितीपासून १० वर्षे उलटल्यानंतर सुध्दा लाभांष देवू शकला नाही. अनेक कारखान्यांनी साखर आयुक्तांच्या पूर्व मंजूरीशिवाय किमान १०० ते ५०० अतिरिक्त कामगार भरती करून कारखान्याचे आर्थिक अस्तित्वच धोक्यात आणले आहे. कागदावर तयार केलेला **रिझर्व्ह फंड** कायद्यानुसार कारखान्यांनी स्वतंत्रपणे गुंतविला नाही. एवढेच नव्हे तर प्लँट, मशिनरी, सहविज निर्मिती, इथेनॉल इत्यादी प्रकल्पांसाठी केलेल्या करोडो रूपयांचा खर्च हा पाण्यात गेलेला सर्वत्र दिसतो. १०० रूपयांची वस्तू २५० रूपया पर्यंत खरेदी करण्यात आली. परिणामी केलेली गुंतवणूक व त्यातून मिळणारे उत्पन्न व्यस्त प्रमाणात होत आहे. अनेक कारखान्यांची बाहेरून कर्ज उभारणीची मर्यादा संपलेली असताना, करोडो रूपयांची अतिरिक्त कर्जे साखर कारखान्यांनी काढून, कारखाने आर्थिक डबघाईस आणलेले आहेत. एवढेच नव्हे **तर या कारखान्यांचे सरकारी लेखापरिक्षण हे पुर्णपणे सदोष व कुचकामी ठरलेले आहे.**

सर्वात कहर म्हणजे साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या वैयक्तीक लेखी संमतीशिवाय ऊस बिलातून, **शासनाच्या मंत्री समितीचा आधार घेवून** केलेल्या कपाती ह्यावर देशाचे संविधान व देशातील सर्व कायदे अक्षरशः पायदळी तुडवले आहेत. **२५ वर्षे होवूनही ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या ठेवी या साखर कारखान्यांनी परत केल्या नाहीत. एवढेच नव्हे तर त्या ठेवींवरील व्याजही दिलेले नाही.** आणि या सर्व गोष्टींचे शासकीय लेखापरिक्षण दरवर्षी साखर आयुक्तांच्या कार्यालयातील शासकिय लेखापरिक्षक करीत असतात. परंतु राज्यातील एकाही साखर कारखान्याच्या संचालक व कार्यकारी संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करून कलम ७८,८३,८८ खाली कारवाई करण्यात आली नाही. आणि त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ हा कायदा व अंमलबजावणी करताना महाराष्ट्र सरकारचे दोन्ही प्रतिनिधी सहकार आयुक्त व साखर आयुक्त हे सोईनुसार वागत असल्याचे चित्र सर्वत्र दिसते. **वास्तविक एखादी उत्पादन करणारी सहकारी संस्था ज्या वेळेस वर्षानुवर्षे सभासदांना लाभांश देत नाही, त्यावेळेस त्या संस्थेचे अस्तित्व निबंधकांनी कायम ठेवणे हा संविधानाचा घोर अपमान असून, जनतेच्या पैशाशी केलेली प्रतारणा आहे.** ज्या भुगर्भात पाणी शिल्लक नाही, आणि पाण्याचे आजूबाजूला स्त्रोत्र उपलब्ध नाही, किंवा अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यांना ऊसाचा पुरवठा कमी होत असताना नवीन साखर कारखान्यांना परवानगी देण्याचे शासनाचे धोरण हे जनतेच्या आर्थिक उत्थानासाठी आहे हे म्हणण्याचे धाडस या देशातला कुठलाही सुज्ञ नागरीक करील यावर आमचा विश्वास नाही. आणि अशा प्रकारच्या कारखान्यांतील त्रुटी व गंभीर आर्थिक गैरव्यवहाराच्या बाबी महाराष्ट्र राज्याच्या **''कॅग ''**अहवालामध्ये ( शासनाचा ऑडीट रिपोर्ट ) स्पष्टपणे जाहीर झाल्या आहेत. आणि एवढे असताना याबद्दल सत्ताधारी व विरोधी पक्षाचे नेते या विषयावर राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकींमध्ये भाष्य करताना दिसलेले नाहीत. आणि हीच शोकांतिका राज्याचा आर्थिक कणा आणखी दुबळा करण्यास कारणीभूत ठरत आहे, असे किळसवाणे चित्र दिवसेंदिवस दिसत आहे.

राज्यात ह्या परिस्थितीमुळे सर्वसामान्य माणसाला लाचार व दुबळे केलेले आहे. राज्यातील १२ कोटी जनतेने भविष्यात कोणाकडे बघायचे ? I.A.S.अधिकारा आपली वैधानिक जबाबदारी पार पाडण्यास तयार नाही.

थोर **समाजसेवक मा. अण्णासाहेब हजारे  यांना पतसंस्था आणि बँका** यांच्या पलिकडे राज्याच्या सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक समस्या व त्याची कारणे आम्ही वेळोवेळी निदर्शनास आणून दिली आहेत. मा. अण्णा साहेब हजारे यांच्या घराच्या बाजूच्या **पारनेर सहकारी साखर कारखान्याने** तर या राज्याची शरमेने मान खाली घालविली आहे. कारखान्यावर सध्या अवसायक आहे. असवायकाने हा कारखाना भाडेपट्टीवर चालविण्यास दिला आहे. या अगोदरच्या पदाधिकारी व संचालक महाभागांनी,  या कारखान्याच्या कामगारांना पुर्णपणे देशोधडीला लावले आहे. कामगारांच्या नावे बाहेरील पतसंस्था व बँकेतून कर्जे काढून कारखान्यात पैसे गुंतविण्यात आले. कारखाना अशा पध्दतीने अक्षरक्षः लुटला गेला. शेवटी पतसंस्थांमधील व बँकातील देणी मात्र कामगारांनी द्यावी यासाठी न्यायालयांचे विविध आदेश त्यांचेवर आहेत. एम. एस. ई. बी. चे  लाईटबील सुध्दा भरले नाही. वीज तोडण्यात आली. कामगारांचा प्रा. फंडसुध्दा या महाभागांनी वापरला. **एवढेच नव्हे तर राज्य सहकारी बँक, मुंबै बँके सारख्या बँकाना कराड़ो रूपयांना ठगविले.** आणि आज रोजी देय रक्कम व येणे रक्कम यामध्ये प्रचंड व्यस्त प्रमाण आहे. देणे रक्कम ८० टक्के तर येणे रक्कम २० टक्के आहे. याचाच अर्थ **पारनेर कारखान्याची प्रापर्टी, जमिन, अस्थावर जंगम मालमत्ता विकली तर केवळ २० कोटी रूपये मिळतील परंतु देणे मात्र ८० कोटी रूपये आहे. अशा परिस्थितीत हे पैसे कोण देणार ? याला कारणीभूत कोण? याचा विचार मा. अण्णा हजारे यांची चळवळ केव्हा करणार?** तसेच रिझर्व्ह बँक, नाबार्ड, साखर आयुक्त व सहकार आयुक्त, शासकीय लेखापरिक्षक, पोलिस यंत्रणा यांना, पारनेर साखर कारखान्याचे वरील व इतर अनेक कारनामे केव्हा दृष्टीक्षेपात येणार ? हा उदाहरणादाखल खरा प्रश्न राज्यातील सर्वसामान्य जनतेसमोर आहे.

म्हणून संविधानाची चेष्टा, सहकारी कायद्याची सोईनुसार अंमलबजावणी, हे केवळ याच राज्यात घडू शकते. एका - एका कारखान्यात किमान १५ ते २० कोटी रूपये शेतकऱ्यांच्या ठेवीच्या रकमा व किमान ५ कोटी व्याजाच्या रकमा गेली २५ वर्षे शेतकऱ्यांना परत दिल्या नाहीत. मा. साखर आयुक्त व लेखापरिक्षक यांना आपल्या कर्तव्याची जाणीव आता तरी झाली पाहिजे व सर्वार्थाने हे थांबविले पाहिजे. लुटारूंना आतातरी जेल मध्ये टाका. ह्यांच्या मालमत्ता गोठवून लिलाव करा. क**ारण सहकारी कायदा काय फक्त पतसंस्थांना व बँकासाठीच आहे काय?** कायदा सर्वांना समान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपकार विसरू नका.  अन्यथा काळ  कोणालाही माफ करणार नाही.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!